Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
**PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,**
**Other Exam- 2: PHONE :0231-2609120 oe2.exam@unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004, महाराष्ट्र
दूरध्वनी–ईपीएबीएक्स–2609000, www.unishivaji.ac.in,
इतर परीक्षा 2:फोन नं. 0231-2609120 oe2.exam@unishivaji.ac.in

जा. क./शिवाजी. वि./इ.प2/3/ए.एस.जी./203 दि 11.03.2024

## एम.ए/इतर परीक्षा विभाग 2 – परिपत्रक

प्रति,

1) मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक
पदव्युत्तर अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2) मा. प्राचार्य / मा.संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय : 1. एम.ए/पी.जी. डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या **NEP 1.0 मधिल SEC Paper- I /II/III/ IV** या पेपरचे **गुण संगणक प्रणालीत भरणेबाबत.**
2. **Practical Exam /Dissertation/Viva/Internal Exam** या पेपरचे **गुण संगणक प्रणालीत भरणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल, 2024 च्याएम.ए./पी.जी. डिप्लोमा कोर्सेसच्या इतर परीक्षा 2 विभागाशी संबंधित परीक्षा या अधिविभाग /संलग्नीत महाविद्यालयात होणार आहेत. त्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. SEC Paper- I to IV/ Practical Exam /Dissertation/Viva/Internal Exam या परीक्षा संबंधित महाविद्यालय व अधिविभागात होत आहेत. या सर्व परीक्षेच्या तारखा सर्व विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात.
2. **SEC Paper - I to IV परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आलेल्या आहेत. SEC विषयांची लेखी परीक्षा झालेनंतर 10 दिवसांचे आत सदर पेपर तपासून, संबंधित महाविद्यालय/अधिविभागांनी त्याचे गुण संगणक प्रणालीत भरून, तो गुण तक्ता (Hard Copy) संबंधित विभागात जमा करावयाची आहे..**
3. **Practical Exam /Dissertation/Viva/Internal Exam या परीक्षा लेखी परीक्षेपूर्वी आयोजित करणेत याव्यात व त्याचे गुणतक्ते** Hard Copy) **लेखी परीक्षेपूर्वी संबंधित विभागात जमा करावेत.**
4. नियमित विद्यार्थ्यांचे गुणतक्ते (Hard Copy) इतर परीक्षा 2 विभागात जमा करण्यात यावेत. तसेच दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रानी त्यांचे गुण तक्ते (Hard Copy) दुरस्थ व ऑनलाईन केद्राकडे जमा करावी. गुण तक्ता (Hard Copy) विहीत कालावधीत जमा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
5. **सदर गुणतक्ते जमा करताना संबंधितांनी ती तपासून प्राचार्य/विभागप्रमुखांच्या सहीने सांक्षांकित करून जमा करावयाची आहे.**
6. गुण भरण्यासाठी आवश्यक ती लिंक आय.टी. विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. **निकाल जाहीर करताना सदर गुणांमुळे निकाल प्रलंबित राहू नये, याची दक्षता घेण्यात यावी.** सदर परीक्षेचे गुण संगणक प्रणालीत विहीत वेळेत भरण्यात यावेत.
7. **सिस्टिम मध्ये गुण भरताना, अनुपस्थित विद्यार्थ्यांना अबसेंट असे भरावे. उपस्थित विद्यार्थ्यांचे गुण सिस्टीममध्ये भरण्यात यावेत. सदरप्रमाणे गुण भरून तपासून, त्यानंतर निश्चित (Confirm) करण्यात यावेत. कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांचे गुणदान करणे व ते सिस्टीममध्ये भरावयाचे राहू नये, याची दक्षता आपल्या स्तरावर घेण्यात यावी.**
8. निकाल जाहीर केलेनंतर विद्यार्थ्यांच्या निकालात अबसेट आल्यास, काही महाविद्यालये/अधिविभाग निकाल जाहीर झालेनंतर संगणक प्रणालीत गुण भरलेस, संगणक प्रणालीमध्ये गुण भरलेप्रमाणे दिसून येतात. मात्र असे गुण निकालामध्ये/लेजरला सदरचे गुण येत नाहीत. अशा प्रती सादर करून नयेत. याची नोद घ्यावी. **त्यामुळे विहीत वेळेतच संगणक प्रणालीतच गुण भरणेत यावेत.**
9. निकाल जाहीर केल्यानंतर गुण दिल्यास विद्यापीठ नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही होवू शकते, याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत – 1. आय.टी. सेल – गुण भरण्याकरीता लिंक उपलब्ध करून देण्यात यावी.
2. परीक्षक नियुक्ती विभागास माहितीसाठी